निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २६५ वा.
शनिवार :२९ नोव्हेंबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

## महाराष्ट्रातील निवडणुकांना स्थगिती? सुप्रीम कोर्टाचा मोठा निर्णय....



**मुंबई /** महाराष्ट्रातील नगरपरिषद, नगरपंचायत निवडणूक ठरल्याप्रमाणे होईल असं सुप्रीम कोर्टाने स्पष्ट केलं आहे. सुप्रीम कोर्टाने निवडणुकीवर कोणतीही स्थगिती आणलेली नाही. निवडणुकीत आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडण्यात आली असून १५ जिल्ह्यांमध्ये सरपंच आरक्षणातही ५० टक्क्यांचा निकष पाळण्यात आलेला नाही असा आक्षेप नोंदवण्यात आला आहे. यासंदर्भात आज सुप्रीम कोर्टात सुनावणी पार पडली. २१ जानेवारीला पुढील सुनावणी होणार आहे. सुप्रीम कोर्टाने आम्ही तीन न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर सुनावणी करु असं सांगितलं आहे.

तेलंगणात ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडण्यात आली असल्याने, उच्च न्यायालयाने ताशेरे ओढले आणि राज्य निवडणूक आयोगाने तेथील निवडणुकांना स्थगिती दिली. महाराष्ट्रातही मर्यादा ओलांडण्यात आली असल्याने, निवडणुकांवर स्थगिती येणार का? याकडे सर्वांचं लक्ष होतं. मात्र सुप्रीम कोर्टाने राज्यातील निवडणुकीला स्थगिती दिली नसल्याने, ठरल्या वेळेत पार पडणार आहेत.

**सुप्रीम कोर्टात सुनावणीदरम्यान काय घडलं?**

वरिष्ठ वकील इंदिरा जयसिंग: बांठिया आयोगाच्या अहवालावर आम्ही आक्षेप घेतो कारण त्याचा हेतू ओबीसींची संख्या कमी करणे हा होता आणि फक्त आडनाव विचारात घेतले गेले होते.

सरन्यायाधीश सूर्यकांत: आज आपल्याकडे एक बेंचमार्क आहे.. बांठिया आयोग. आम्ही ते वाचलेले नाही पण आता कदाचित त्याकडे गंभीरपणे पाहावे लागेल.

जयसिंग: अवमान हा पुनरावलोकन मागण्याचा छुपा मार्ग आहे.

सरन्यायाधीश: येथे आदेशाचा अर्थ लावला जातो किंवा त्याचा चुकीचा अर्थ लावला जातो हा वाद आहे.

सरन्यायाधीश: आम्ही जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत ३ न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी करू.

वरिष्ठ वकील विकास सिंह: तर तोपर्यंत निवडणुका होऊ देऊ नका.

सरन्यायाधीश: आम्ही म्हणणं ऐकलं आहे. मागील सुनावणीत दिलेल्या आदेशाच्या संदर्भात, महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने एक संक्षिप्त नोंद सादर केली होती.

फक्त ४० नगरपरिषदा आणि १७ नगरपंचायत आहेत जिथे आरक्षण ५० टक्क्यांहून अधिक आहे. जे मुद्दे निर्माण होऊ शकतात ते विचारात घेऊन जानेवारी २०२६ च्या दुसऱ्या आठवड्यात ३ न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर प्रकरण सूचीबद्ध करावं. दरम्यान, नगरपरिषदा, नगरपंचायतींच्या निवडणुका अधिसूचित वेळापत्रकानुसार होऊ शकतात परंतु वरील ४० आणि १७ चे निकाल या कार्यवाहीच्या अंतिम निकालाच्या अधीन असतील.

## सर्व सरकारी व खासगी आस्थापनांना पोश कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करावी -महिला व बालविकास आयुक्त नयना गुंडे

## पोश कायद्याचे उल्लंघन केल्यास ५० हजार दंड




**मुंबई /** महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी सर्व सरकारी विभाग, निमशासकीय संस्था तसेच खासगी आस्थापनांनी प्रिव्हेशन ऑफ सेक्शुअल हॅरेसमेंट क्ट कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. यासाठी सर्व आस्थापनांनी अंतर्गत समिती तातडीने गठीत करण्याचे आवाहन महिला व बालविकास आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे.

ज्या कार्यालये किंवा आस्थापनांमध्ये १० किंवा त्याहून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत, त्यांनी अंतर्गत समिती स्थापन करणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट केले आहे.

राज्यातील शासकीय, निमशासकीय कार्यालये, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय कंपनी, नगरपरिषद, तसेच शासन अथवा स्थानिक प्राधिकरणाकडून निधी प्राप्त करणाऱ्या सर्व संस्थांमध्ये अंतर्गत समिती स्थापन करावी लागणार आहे. त्याचप्रमाणे खासगी कंपन्या, उद्योग, सेवा पुरवठादार संस्था, शैक्षणिक संस्था, रुग्णालये, मनोरंजन क्षेत्रातील संस्था, क्रीडा संघटना, क्रीडा संकुले आदी सर्व खासगी आस्थापनांनाही हा नियम लागू आहे.

पोश कायद्याचे उल्लंघन केल्यास दंडात्मक कारवाई

कायद्याप्रमाणे तरतुदींचे पालन न केल्यास संबंधित आस्थापना प्रमुखास कलम २६ नुसार ५०,००० रुपयांपर्यंत दंड तसेच, उल्लंघनाची पुनरावृत्ती झाल्यास दंड दुपटीने वाढविणे, आस्थापनेचा परवाना रद्द करणे किंवा अन्य कठोर कारवाई करण्याची तरतूद आहे. अंतर्गत समितीची माहिती केंद्र सरकारच्या शी बॉक्स पोर्टलवर (shebox.wcd.gov.in) अद्ययावतपणे अपलोड करावी.

तसेच नागरिक ज्या कार्यालये किंवा आस्थापनांना भेट देतील, त्या ठिकाणी अंतर्गत समितीचा फलक प्रदर्शित नसेल, तर त्याबाबत तक्रार १८१ या महिला हेल्पलाईनवर तक्रार करावी.

असे आवाहनही आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे.

## नगरपरिषद व नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी १ डिसेंबरला रात्री १० पर्यंत प्रचाराची मुदत

**मुंबई /** नगरपरिषदा आणि नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान होत असून, त्यासाठीच्या जाहीर प्रचाराची मुदत 'महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५' मधील तरतुदीनुसार १ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १० पर्यंत असेल.




राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांस संबंधित कायद्यांमधील तरतुदींनुसार घेतल्या जातात. नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांसंदर्भातील कायद्यात जाहीर प्रचाराचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार मतदान सुरू होण्याच्या अगोदरच्या दिवशी म्हणजे १ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १० वाजल्यापासून प्रचार पूर्णपणे बंद होईल. त्यानंतर प्रचारसभा, मोर्चे आणि ध्वनिक्षेपकाचा वापर करता येणार नाही.

त्याचबरोबर निवडणूक प्रचाराशी संबंधित जाहिरातींची प्रसिद्धी किंवा प्रसारण करता येणार नाही.

## कारकिर्दीच्या यशस्वीतेत टीम वर्क महत्वाचे -मुख्य सचिव राजेश कुमार

**मुंबई /** महाराष्ट्र हा माझ्या रक्तात, स्वभावात आणि आचरणात असून कोणत्याही पदावर यशस्वी होण्यासाठी माती आणि संस्कृतीशी एकरुप होणे गरजेचे आहे. आपल्या भारतीय प्रशासकीय सेवेच्या कारकिर्दीत सहकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसोबतचे टीम वर्क महत्त्वाचे ठरल्याची भावना मुख्य सचिव राजेश कुमार यांनी व्यक्त केली.

मुख्य सचिव राजेश कुमार ३० नोव्हेंबर २०२५ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. या पार्श्वभूमीवर सामान्य प्रशासन विभागामार्फत त्यांचा सेवापूर्ती समारंभ मंत्रालयात आयोजित करण्यात आला. यावेळी सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय अधिकारी कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती अधिकारी कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ, आयएएस अधिकारी संघटना यांच्यावतीने त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी राजेश कुमार यांच्या पत्नी अर्चना राजेश कुमार, अपर मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, अपर मुख्य सचिव व्ही.राधा यांच्यासह वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, मंत्रालयीन अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.




यावेळी भावना व्यक्त करताना मुख्य सचिव राजेश कुमार म्हणाले, मुख्य सचिव पदावर काम करताना आपण सर्वांना सोबत घेऊन काम करण्याचा प्रयत्न केला. ३७ वर्षांहून अधिक काळ सेवा करताना विविध विभागांमध्ये आणि शहरांमध्ये काम केले. यादरम्यान राज्याच्या कानाकोपऱ्यातील लोकांना भेटण्याचा योग आला असून हीच आपली ताकद आहे. राज्यातील प्रत्येक अधिकाऱ्याकडे क्षमता आणि अनुभव असून त्यांनी महाराष्ट्र सर्व क्षेत्रांमध्ये अग्रस्थानी नेण्यासाठी एकमेकांना सहकार्य करीत काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

अपर मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मिलिंद म्हैसकर, विकास खारगे, वेणुगोपाल रेड्डी, अपर मुख्य सचिव अश्विनी भिडे, प्रशासकीय अधिकारी निपूण विनायक, सहसचिव डॉ.श्रीकांत पुलकुंडवार, अवर सचिव विठ्ठल भास्कर आदींनी यावेळी मनोगतात राजेश कुमार यांच्या कारकीर्दीचा गौरव करुन त्यांना शुभेच्छा दिल्या. सहसचिव विजय चौधरी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## अधिवेशनासाठी हातमागावरील पर्यावरणपूरक कापडांचे बुके

**नागपूर/** हातमागावर पारंपरिक कापडांच्या निर्मितीचे प्रमुख केंद्र म्हणून नागपूरची ओळख आहे. प्रादेशिक वैशिष्ट्यांनुसार स्थानिक कलावंत या कापडाची निर्मिती करतात. विधिमंडळ अधिवेशनानिमित्त हातमाग महामंडळाने आकर्षक व पर्यावरणपूरक कापडाचे बुके तयार केला आहेत. कापडाचे बुके या संकल्पनेला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

विविध समारंभामध्ये फुलांचा बुके देण्याची परंपरा आहे. त्याऐवजी कायम स्मरणात राहील आणि बुकेतील साहित्य दैनंदिन वापरासाठी उपयुक्त ठरेल, अशा हातमागावरील विविध कापडांचा समावेश असलेले आणि तेवढेच आकर्षक कापडाचे बुके हातमाग महामंडळाने तयार केले आहेत. अधिवेशनासाठी येणाऱ्या अभ्यागतांच्या स्वागतासाठी हा बुके निश्चितच संस्मरणीय ठरणार आहे.

नागपूर हे मध्य भारतातील हातमागाचे प्रमुख केंद्र म्हणून ओळखले जाते. हातमागावरील विविध तयार कपड्यांना संपूर्ण देशात मागणी आहे. रेशीम साडयांपासून टॉवेल, चादर, रुमाल, सूती साडया आदी कापड हातमागावर स्वदेशी डिझाईनचा वापर करुन तयार करण्यात येते. यासाठी प्रादेशिक वैशिष्ट्यानुसार तसेच फॅशनचा अभ्यास करुन कलात्मक व कौशल्याचा वापर करुन पर्यावरणपूरक वस्त्रांची निर्मिती केली जाते. शासनाने हातमाग उद्योगाचा विकास करण्यासाठी राष्ट्रीय हातमाग विकास कार्यक्रमाची आखणी केली आहे. येथील हातमागावरील वस्तूचे आकर्षण आहे. ही परंपरा पिढयानपिढया जपली जात असतानाच व्यवसायातील तंत्रज्ञानाचे जतन करताना आधुनिकतेची जोड मिळत असल्यामुळे हा समृध्द वारसा जतन होत आहे.



हातमाग महामंडळातर्फे विणकरांना प्रोत्साहन देण्यासोबतच नवनिर्मित कापडांच्या निर्मितीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. हातमागावरील निर्मित कापडाला बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असल्यामुळे बाजारपेठेसोबतच स्पर्धा करण्यासाठी नवतंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. कापडी बुके ही संकल्पना उमरेड रोडवरील हातमाग महामंडळाच्या केंद्रात सुरु करण्यात आली असून, नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे सहव्यवस्थापकीय संचालक गंगाधर गजभिये यांनी सांगितले.

नागपुरी साडी, कोसा, सिल्क आदी दर्जेदार कापड हातमागावर तयार करण्यात आलेल्या बुकेसोबत आकर्षक कापडी बॅग तयार करण्यात आली आहे. कापडी बुकेमध्ये नॅपकीन, रुमाल, टॉवेल आदींचा समावेश करण्यात आला आहे. त्यासोबतच हस्तकलेद्वारे निर्मित केलेल्या बकेटमध्ये विविध प्रकारच्या हातमाग कापडांचा समावेश असलेले व तेवढयाच आकर्षक वेष्टनात कापडी बुके उपलब्ध आहेत. यासाठी हातमाग महामंडळाच्या अधिकृत केंद्रावरुन विक्रीची व्यवस्था करण्यात आली आहे.

## शासनाचा निर्णय: ग्रामीण भागात ५० टक्के घरपट्टी, पाणीपट्टी माफ..

## आमखेडा ग्रा. पं. कडून अंमलबजावणी; नागरिकांचा मोठा प्रतिसाद

**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव / प्रतिनिधी** /एकरकमी करसवलतीमुळे पाणीपुरवठ्यासारख्या योजना प्रभावित होत असतील तर त्या संबंधीचा निर्णय किंवा मासिक सभेत ग्रामपंचायतीनेच घ्यावयाचा आहे. शासनाची ही योजना लागू करायची की नाही याचा अंतिम निर्णय सुद्धा ग्रा.पं. कडे असल्यामुळे आमखेडा ता. सोयगाव जि. छ. संभाजीनगर

ग्रामपंचायतने तातडीने निर्णय घेवून अंमलबजावणी सुरू केल्याची माहिती सरपंच श्रीमती नंदाताई संजय आगे यांनी दिली. नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतांना दिसून येत आहे.

राज्यातील ग्रामपंचायतीच्या थकीत करवसुलीला वेग देण्यासाठी राज्य शासनाने ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. ग्रामपंचायतीच्या निवासी मालमत्ता करासह (घरपट्टी), पाणीपट्टी आणि दिवाबती करावर एकरकमी भरल्यास ५० टक्के सवलत

**अंतिम मुदत ३१ डिसेंबरपर्यंत..**

करवसुलीला वेग देण्यासाठी राज्य शासनाने करसवलत योजना राबवली आहे. करसवलत ही अभियानापुरती मर्यादित असल्याने ग्रामस्थांनी ३१ डिसेंबरपूर्वी एकरकमी कर भरपाई केल्यासच ५० टक्के सवलतीचा लाभमिळणार आहे. या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन ग्रा. पं. प्रशासनाने केले आहे.

देण्याची घोषणा केली आहे. ही योजना ३१ डिसेंबरपर्यंतच लागू असणार असून सर्व जिल्हा परिषदांना सदर अंमलबजावणीचे आदेश देण्यात आले आहेत. राज्यातील अनेक ग्रा. पं. मध्ये करवसुली अपुरी असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली होती. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत ग्रामपंचायती आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हाव्यात तसेच विकास कामांसाठी निधी उपलब्ध व्हावा, यासाठी ही करसवलत योजना आवश्यक राबवली जात आहे. थकीत कराची एकरकमी वसुली झाल्यास ती रक्कम थेट

**ग्रामसेवकांवरील ताण कमी होणार..**

हजारो रुपयांमध्ये कर असलेल्या ग्रामपंचायतींना या शासनाच्या ५० टक्के सवलतीमुळे दिलासा मिळणार आहे. तसेच करांची वसुली न झाल्यास वरिष्ठ अधिकारी कारवाई करत असल्याने ग्रामसेवकांवर मोठ्या प्रमाणात ताण येत होता. तो कमी होणार आहे. सदर निर्णयामुळे मोठ्या लोकसंख्येच्या ग्रामपंचायतींना मोठ्या प्रमाणात लाभ होणार आहे.

विकास प्रक्रियेत वापरता येणार आहे. जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना या मोहिमेचा



पाठपुरावा करण्याची जबाबदारी देण्यात आली असून प्रत्येक ग्रामपंचायतीत ही योजना प्रभावीपणे राबवली जाणार आहे. आमखेडा ग्रा. पं.सरपंच नंदाताई आगे यांच्या पुढाकारामुळे गावकऱ्यांना ५० टक्के सूटची दवंडी देऊन जनजागृती केली आणि गावकऱ्यांची सुद्धा कर भरण्याकडे ओढ लागली असून गावकऱ्यांनी सरपंच यांचे आभार मानले.

# चुकलेली संघ निवड आणि फसलेली रणनीती.....

गुवाहाटी येथे झालेल्या दुसऱ्या कसोटीत भारतीय क्रिकेट संघाला ४०० पेक्षा अधिक धावांनी नमवून दक्षिण आफ्रिकेने भारताला २ – ० असे नमवून व्हाइट वॉश दिला. क्रिकेट रसिकांसाठी हा पराभव धक्कादायक होता कारण पहिल्या कसोटीतही दक्षिण आफ्रिकेने भारताचा असाच लाजिरवाणा पराभव केला होता. या लाजिरवाण्या पराभवानंतर क्रिकेट प्रेमींमध्ये संतापाची लाट उसळली आहे आणि ते साहजिकही आहे कारण भारतीय भूमीवर झालेला हा भारताचा पहिलाच पराभव नाही. मागील वर्षी न्यूझीलंड संघानेही भारताचा असाच लाजिरवाणा पराभव करत मालिका ३ – ० ने जिंकत भारताला असाच व्हाइट वॉश दिला होता. वर्षभरात दोनदा परदेशी संघाने भारताला भारतात येऊन हरवले ते ही अतिशय लाजिरवाण्या पद्धतीने त्यामुळे क्रिकेट प्रेमींमध्ये नाराजीची भावना पसरली आहे. पूर्वी भारतात येऊन भारताला हरवणे हे परदेशी संघासाठी मोठे दिव्य होते. भारतीय भूमीवर भारत अपराजितच होता. इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका अशा कोणत्याच संघाला भारतात येऊन मालिका विजय मिळविणे शक्य नव्हते. मालिकेतील एखादा दुसरा सामना ते जिंकायचे पण मालिका मात्र भारतच जिंकायचा. भारताला भारतात येऊन व्हाइट वॉश देणे ही तर अशक्यप्राय गोष्ट होती पण आता मात्र परदेशी संघासाठी ते सहज शक्य झाली आहे. असे काय कारण आहे की भारतीय संघ आपल्याच भूमीवर जिंकू शकत नाही असा प्रश्न क्रिकेट वर्तुळात विचारला जात आहे याचे सरळ आणि साधे उत्तर आहे ते म्हणजे चुकलेली संघ निवड आणि फसलेली रणनीती....

या कसोटी मालिकेसाठी जो भारतीय संघ निवडला होता तोच मुळी कसोटी क्रिकेटच्या योग्यतेचा नव्हता. या कसोटी मालिकेसाठी जो संघ निवडला त्यातील किती खेळाडू हे कसोटी खेळण्याच्या लायक होते ? हा संशोधनाचा विषय आहे. या संघात जे फलंदाज निवडले त्यांच्याकडे कसोटी क्रिकेटसाठी लागणारे तंत्र आहे का तर याचे उत्तर नाही असेच देता येईल. कसोटी मालिकेसाठी निवडलेला संघ कसोटी दर्जाचा नव्हता. या संघात निवड झालेले खेळाडू हे आयपीएल गाजवलेले धुरंदर होते.

टी २० आणि कसोटी क्रिकेट यात जमीन अस्मानचा फरक आहे. कसोटीसाठी लागणारे तंत्र आणि संयम या खेळाडूंकडे नाही. फिरकी गोलंदाजी खेळण्यासाठी जे तंत्र लागते ते एकाही फलंदाजाकडे दिसले नाही. निवड समितीने जी चूक केली तीच किंबहुना त्याहून मोठी चूक संघ व्यवस्थापनाने केली. या मालिकेत संघ व्यवस्थापनाची रणनीती पूर्णपणे फसलेली दिसली. संघ व्यवस्थापनाने रचलेली एकही चाल यशस्वी ठरली नाही. भारतीय संघ व्यवस्थापन संघाची घडी बसवताना गोंधळलेला दिसला. पहिल्या कसोटीत चक्क चार फिरकी गोलंदाज खेळवण्यात आले. चार फिरकी गोलंदाज खेळवण्याची संघ व्यवस्थापनाची रणनीती पूर्णपणे फसली. चार फिरकी गोलंदाज खेळवल्यामुळे एक फलंदाज कमी पडला. त्यात शुभमन गिल जायबंदी झाल्यावर आपल्याकडे फलंदाजच उरला नाही कारण यशस्वी जयस्वाल, ऋषभ पंत हे कसोटीतही टी २० चा खेळ खेळतात. ध्रुव जुरेल हा नवखा फलंदाज असल्याने त्याच्याकडून जास्त अपेक्षा नव्हत्या. उरला एकटा के एल राहुल पण तो ही फॉर्मात नाही मग धावा करणार कोण ? जी गत पहिल्या कसोटीत झाली तीच गत दुसऱ्या कसोटीतही झाली. दुसऱ्या कसोटीत एक फिरकी गोलंदाज कमी करून नितीश कुमार रेड्डी याला खेळवण्यात आले पण त्याने दुसऱ्या कसोटीत ना गोलंदाजीत विकेट घेतल्या ना फलंदाजीत धावा काढल्या. विशेष म्हणजे दुसऱ्या कसोटीच्या दुसऱ्या डावात त्याला फक्त एकच षटक गोलंदाजी दिली. त्याला जर गोलंदाजीच द्यायची नव्हती तर मग त्याला खेळवलेलेच का ? त्याच्या ऐवजी एक स्पेशालिस्ट फलंदाज खेळवला असता तर किमान भारताच्या काही धावा वाढल्या तरी असत्या. पहिल्या कसोटीत तिसऱ्या क्रमांकावर खेळलेल्या वॉशिंग्टन सुंदर दुसऱ्या कसोटीत थेट आठव्या क्रमांकावर आला. दुसऱ्या कसोटीत तिसऱ्या क्रमांकावर आलेला साई सुदर्शन फक्त हजेरी लावून गेला. ध्रुव जुरेलनेही तेच केले. या दोघांनी इंग्लंड दौऱ्यावर देखील काहीच केले नव्हते तरीही त्यांची निवड करण्यात आली. जर योग्य खेळाडूंची निवड झाली असती आणि रणनीती फसली नसती तर असा लाजिरवाणा पराभव झाला नसता. म्हणजेच चुकलेली संघ निवड आणि फसलेली रणनीती यामुळेच हा लाजिरवाणा पराभव भारतीय संघाला स्वीकारावा लागला.

या पराभवातून धडा घेऊन बीसीसीआयने निवड समिती आणि संघ व्यवस्थापनाला बरखास्त करायला हवे. बीसीसीआयने नवीन निवड समिती आणि नवा प्रशिक्षक लवकरात लवकर निवडायला हवा. प्रशिक्षकपदी गंभीर आल्यापासून भारतीय संघाची पिछेहाटच होत आहे विशेष म्हणजे सतत पराभव होऊनही गंभीर आपली रणनीती बदलायला तयार नाही तर निवड समिती अध्यक्ष अजित आगरकर हे चुकीची संघ करत आहे. या दोघांचीही गच्छंती करण्याची वेळ आली आहे जर या दोघांना आणखी अभय दिले तर या पराभवाची पुनरावृत्तीच पहायला मिळू शकते.

# ठक्कर बाप्पा : समाजसुधारणेचे मानवतावादी रूप

भारतीय समाजाच्या विशाल इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी जन्माला येतात की ज्यांची कार्यशक्ती, मनोभूमिका आणि जीवनातील नीतिमूल्ये ही समाजाच्या परिवर्तनाची क्षैतिज आणि उभ्या दोन्ही पातळ्यांवर खोलवर परिणाम करतात. ठक्कर बाप्पा हे असेच एक विलक्षण व्यक्तिमत्त्व. आदिवासी, भटके-विमुक्त, दलित, वंचित, पीडित आणि सामाजिक रचनेत मागे पडलेल्या घटकांमध्ये त्यांनी निर्माण केलेला विश्वास, सन्मान आणि स्वावलंबनाची भावना आजही अतुलनीय मानली जाते. त्यांच्या कार्याने संपूर्ण भारतातील आदिवासी व दुर्लक्षित समाजाचे जीवन केवळ उन्नत झाले नाही, तर त्यांच्या सांस्कृतिक वारशाला, जीवनमानाला आणि सामाजिक ओळखीला एक नवीन प्रतिष्ठा मिळाली.

**जन्म, शिक्षण आणि प्रारंभिक आयुष्य**

२९ नोव्हेंबर १८६९ रोजी गुजरातमधील भागलपूर (जि. भावनगर) या साध्या गावात ठक्कर बाप्पांचा जन्म झाला. मूळ नाव ठाकुरजी झवेरभाई मोवजीवाला. लहानपणापासूनच शिस्तप्रियता, सुसंस्कार आणि समाजसेवेचे मूल्य त्यांच्या मनावर बिंबलेले होते. अभियांत्रिकीचे शिक्षण संपादन करून त्यांनी सरकारी नोकरीला प्रारंभ केला. कार्यकौशल्य, प्रामाणिकपणा आणि कर्तव्यनिष्ठा यामुळे ते प्रशासकीय कामात अत्यंत कुशल म्हणून ओळखले जाऊ लागले.

परंतु नियतीने त्यांच्यासाठी काही वेगळेच कार्य राखून ठेवले होते. १९१४ मध्ये जबाबदारीच्या भूमिकेत असताना आदिवासी भागात कार्यरत राहण्याची संधी मिळाली. त्यांच्यासारख्या संवेदनशील मनावर आदिवासींची दारिद्र्यपूर्ण अवस्था, व्यसनाधीनता, अशिक्षितपणा, रक्तक्षय, अंधश्रद्धांचा पगडा आणि सामाजिक बहिष्काराचे चित्र तीव्र परिणाम करून गेले. ही दृश्ये त्यांच्या अंतर्मनाला हादरवणारी ठरली आणि त्यांच्या जीवनाचे 'ध्येय' याच क्षणी निश्चित झाले.

**गांधीजींचा प्रभाव आणि नोकरीचा त्याग**

गांधीजींच्या कार्याचा आणि विचारसरणीचा त्यांच्यावर मोठा प्रभाव होता. गांधीजींनी सांगितलेले स्वयंपूर्णता, अहिंसा, सत्य, असहकार, सेवा आणि सादगी यांचे तत्त्वज्ञान ठक्कर बाप्पांच्या जीवनाचा अविभाज्य भाग झाले. अखेर ५० व्या वर्षी, अनेकजण निवृत्तीची वाट पाहत असताना त्यांनी उलट जीवनाला नवीन दिशा देत नोकरीचा राजीनामा दिला. हा त्यांचा 'नवा जन्म' होता–संपूर्णपणे समाजासाठी अर्पण केलेले आयुष्य.

**आदिवासी समाजाबाबत त्यांची दृष्टी**

ठक्कर बाप्पांनी आदिवासी समाजाकडे कधीही दया किंवा अनुकंपेच्या नजरेने पाहिले नाही. ते म्हणत,

आदिवासी समाज हा भारताचा आदिम वारसदार आहे; त्याच्या संस्कृतीची जपणूक करणे हा आपला कर्तव्यधर्म आहे.**

त्यांच्या मते आदिवासी म्हणजे अशिक्षित लोक नव्हे; तर निसर्गाशी नाते सांगणारे, स्वाभिमानी, कलावंत आणि पारंपरिक ज्ञानाचे खरे धनी. म्हणूनच त्यांच्या विकासाचे तत्त्वज्ञान होते– सहभागातून विकास , दानातून नव्हे .

**अभूतपूर्व संस्थात्मक कार्य**

ठक्कर बाप्पांनी उभारलेल्या संस्था म्हणजे भारतीय सामाजिक इतिहासातील सुवर्ण पान. त्यांनी देशभरात ४०० हून अधिक संस्था, शाळा, आश्रमशाळा, वसतिगृहे, गुरुकुल, रुग्णालये, उद्योग प्रशिक्षण केंद्रे, जलसंधारण प्रकल्प आणि पुनर्वसन केंद्रे उभारली. गुजरात, महाराष्ट्र, विदर्भ, मध्यप्रदेश, छत्तीसगड, राजस्थान, हरियाणा, उत्तर प्रदेश अशा विविध राज्यांत त्यांची कामे विस्तारली.

विशेषतः महाराष्ट्रातील आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्ये त्यांच्या कार्यामुळे शिक्षणाची क्रांती घडून आली. आजही अनेक आश्रमशाळा त्यांच्या पायाभूत कल्पनेवर उभ्या आहेत.

भटके आणि विमुक्त जमातींसाठी केलेले अपूर्व कार्य

British Criminal Tribes -ct-१८७१ अंतर्गत अनेक भटके-विमुक्त जमातींना जन्मजात गुन्हेगार असा अमानुष शिक्का बसला होता. हा सामाजिक अन्याय ठक्कर बाप्पांसाठी असह्य होता. त्यांनी देशभर मोहिमा राबवून–

* पुनर्वसन केंद्रे स्थापन केली
* उद्योगप्रशिक्षण दिले
* आरोग्य व शिक्षणाच्या सुविधा निर्माण केल्या
* कायदेशीर हक्कांविषयी जनजागृती केली
* व्यसनमुक्ती अभियान राबवले
* सामाजिक समावेश आणि पुनर्स्थापना प्रक्रियांवर भर दिला

त्यांच्या या कार्याने हजारो कुटुंबांचा समाजात सन्मानपूर्वक पुनर्वसन झाला.

**महिला आणि मुलींचे सक्षमीकरण**

ठक्कर बाप्पांना ठाम विश्वास होता की *समाजपरिवर्तनाची खरी चावी महिलांच्या शिक्षणात आहे*. आदिवासी महिलांच्या अत्यंत दयनीय स्थितीने त्यांना व्यथित केले. त्यामुळे त्यांनी–

* मुलींच्या आश्रमशाळा
* मातृआरोग्य केंद्रे
* प्रसूतीसेवा उपक्रम
* पोषण कार्यक्रम
* महिला प्रशिक्षण केंद्रे

अशा उपक्रमांना मोठा प्राधान्य दिले. आदिवासी भागात सदोष रूढी, अंधश्रद्धा आणि परंपरागत अविचार यावर त्यांनी मोठ्या प्रमाणात जागृती मोहीम राबविली.

शेती, जलसंधारण आणि उद्योगातील उल्लेखनीय योगदान ते फक्त शिक्षणदाते नव्हते; तर सर्वांगाने विकास करणारे उदात्त व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी आदिवासी भागात–

* सिंचन प्रकल्प
* बांधबंदिस्ती, कोट आणि बंधारे
* पाणलोट क्षेत्र विकास
* सुधारित शेतीपद्धती
* बागायती प्रशिक्षण
* विणकाम, हस्तकला, लोहारकाम, गवंडीकाम प्रशिक्षण

असे अनेक उद्योगकेंद्र सुरू केले. हजारो युवक-युवतींना रोजगार मिळून त्यांच्या जीवनात स्थैर्य व स्वाभिमान निर्माण झाला.

**त्यांचा संदेश स्पष्ट होता:**

दानातून जगणे शिकवू नका; कौशल्यातून जगण्याची क्षमता द्या.

**गांधीजींचे गौरवोद्गार**

गांधीजींनी ठक्कर बाप्पांना दिलेला मान हा त्यांच्या कार्याची सर्वात मोठी पावती आहे. गांधीजी म्हणाले होते:

जर मी स्वतःला गांधी समजत असेन, तर ठक्कर बाप्पा हे प्रत्यक्ष गांधी आहेत.

ही टिप्पणी ठक्कर बाप्पांच्या त्यागमय सेवा-भावनेची सर्वोच्च दखल मानली जाते.

**ठक्कर बाप्पांच्या विचारांचा आजचा संदभ**

आज भारताला जातीय भेद, आर्थिक विषमता, अंधश्रद्धा, सामाजिक अन्याय, दुर्लक्षित समुदायांच्या समस्या, सांस्कृतिक तुटण आणि आरोग्य-शैक्षणिक अडचणी यांसारखी अनेक आव्हाने आहेत. अशा वेळी ठक्कर बाप्पांचे विचार अधिक सुसंगत वाटतात–

* विकासात समावेशकता
* सन्मानाधारित सुधारणा
* संस्कृतीचे जतन
* शिक्षण आणि आरोग्याचा सार्वत्रिकीकरण
* दुर्लक्षितांचा स्वावलंबनावर भर

हीच त्यांची खरी देणगी.

**त्यांचा वारसा आणि आजची जबाबदारी**

१९५१ साली ठक्कर बाप्पांचे निधन झाले, पण त्यांनी उभारलेली संस्थात्मक रचना आजही जीवंत आहे.

**त्यानंतर स्थापन झालेले-** ठक्कर बाप्पा आदिवासी विकास महामंडळ , **भिल सेवा संघ ,** भटक्या-विमुक्त जमातींची विकास संस्थात्मक रचना हे त्यांच्याच दृष्टीकोनातून प्रेरित आहेत.

आज हजारो विद्यार्थी आश्रमशाळांमध्ये शिकत आहेत, अनेक वसतिगृहे चालू आहेत, आदिवासी विकासाबाबत सरकारी धोरणे ठक्कर बाप्पांच्या विचारांनी सुशोभित होत आहेत. हेच त्यांच्या कार्याचे खरे यश आहे.

**जयंतीचे महत्त्व**

ठक्कर बाप्पांची जयंती म्हणजे केवळ त्यांच्या कार्याचे स्मरण नव्हे; तर *मानवता, समर्पण, निःस्वार्थता आणि समाजबंधन* यांचा पुनर्पुन्हा उच्चार करण्याचा दिवस.

त्यांना खरी श्रद्धांजली म्हणजे–

* आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणणे
* त्यांच्या संस्कृतीला सन्मान देणे
* शिक्षण, आरोग्य आणि स्वावलंबनाच्या संधी वाढवणे
* मानवतेला केवळ शब्दांनी नव्हे, तर कृतीने जगणे

**समारोप**

ठक्कर बाप्पांचे संपूर्ण आयुष्य एक संदेश देते– मानवतेपेक्षा मोठा धर्म नाही, आणि सेवेशिवाय मानवता अपूर्ण आहे.

अशा या महान मानवतावादी समाजसुधारकाच्या जयंतीनिमित्त त्यांचे विचार आणि कार्य समाजासाठी पुन्हा प्रेरणास्रोत ठरत राहो हीच कृतज्ञतेची भावना.

# लाडकी बहीण ईकेवायसी एक जबरदस्त स्कॅम

गेल्यावर्षी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' धुमधडाक्यात सुरू केली. महायुतीने सुरू केलेली 'लाडकी बहीण योजना' महाराष्ट्रात प्रचंड गाजली. या योजनेच्या बळावर महायुतीने विधानसभेत घवघवीत यश मिळवत सत्तेच्या चाव्या परत मिळवल्या. सत्ताधाऱ्यांनी याचे श्रेय राज्यातील महिलांना दिले आणि ते खरंही आहे. महायुती सरकारला शासन दरबारी बसवण्यात लाडक्या बहिणींचा खूप मोठा वाटा आहे. महाराष्ट्र सरकारने २८ जून २०२४ रोजी या योजनेला मंजुरी दिली आणि १८ ऑगस्ट २०२४ रोजी ही योजना सुरु केली. परंतु योजनेचे फायदे जुलै २०२४ पासून देण्यास सुरुवात केली.

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' ही आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गातील २१ ते ६५ वयोगटातील महिलांना आर्थिक मदत पुरवण्यासाठी सुरु केलेली एक महत्त्वपूर्ण योजना आहे. महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य वाढवणे आणि सर्वांगीण विकास साधणे म्हणजेच राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करून कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करणे या उद्दिष्टांचा बनाव करून महाराष्ट्र सरकारने २०२४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या काही महिन्यांपूर्वी 'लाडकी बहीण योजना' सुरू केली होती.

महाराष्ट्रातील 'लाडकी बहीण योजना' निवडणुकीपूर्वी महिलांना भुलवण्यासाठी वापरण्यात आलेले एक षडयंत्र होते. त्याद्वारे १५०० हप्ता देण्यात आला. मात्र, निवडणुकीनंतर निधीअभावी हप्ते थकायला लागले. योजनेमुळे राज्याची आर्थिक स्थिती विस्कटली. यामुळे इतर खात्यांचा निधी वळवला जाऊ लागला.

सरकारच्या या आर्थिक कोंडीमुळे लाडक्या बहिणींमध्ये नाराजी पसरली आणि २१०० चा हप्ता तर कोसो दुरच राहिला, पण सध्या काही बहिणींना १५०० चाही पत्ता नाही. राज्यावर कर्जाचा डोंगर वाढत राहिला आणि सरकार फक्त आश्वासने देत राहिली. ही 'लाडकी बहीण योजना' फक्त निवडणुकीसाठी वापरलेला एक स्कॅम आहे, असं म्हणायला हरकत नाही.

दुसऱ्या राज्याची संकल्पना उचलून महाराष्ट्रात महायुती सरकारने तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात 'लाडकी बहीण योजना' जाहीर केली आणि विधानसभा निवडणुकीच्या काही महिने आधी राज्यभरातील बहिणींना ३ महिन्यांचे प्रत्येकी १५०० प्रमाणे ४५०० खात्यात देऊन लाडक्या बहिणींच्या मतांची भाऊबीज आपल्या ओंजळीत घेतली. पण हीच 'लाडकी बहीण योजना' पुन्हा निवडून आल्यावर राज्य सरकारला महागात पडू लागली. ज्यामुळे राज्याची आर्थिक स्थिती विस्कटली.

'लाडकी बहीण योजना' ऐन निवडणुकीच्या तोंडावर जाहीर केल्यामुळे सरकारने होता नव्हता निधी वापरला. मात्र, पुन्हा निवडून आल्यावर काय करायचे? याचा विचार बहुधा केला गेला नव्हता. त्यातच पुन्हा सरकार यावे या हेतुने १५०० चा हप्ता थेट २१०० करण्याचे आश्वासन देऊन महायुती सरकार मोकळे झाले.

राज्यातील बहिणींनी त्यांच्यावर विश्वास ठेवून त्यांना पुन्हा निवडून दिले. त्यानंतर मात्र महायुती सरकारची पंचायत होऊ लागली. या योजनेसाठी अर्थसंकल्पात तरतूदच केलेली नव्हती. मग काय, आर्थिक ताळमेळ बसवण्यासाठी इतर खात्यातील निधी वळवण्याची व पळवण्याची वेळ आली.

राज्यासमोर आर्थिक संकट वाढायला लागले. महसुली उत्पन्नापेक्षा खर्च जास्त आहे. कर्ज व व्याजापोटी मोठी रक्कम खर्च होत आहे. भांडवली खर्चासाठी दुसरे कर्ज काढण्याशिवाय पर्याय नाही. आर्थिक पाहणी सर्वेक्षण अहवालातून राज्याची गंभीर स्थिती समोर आली. म्हणजे खर्चाच्या तुलनेत उत्पन्न कमी आहे. कर्ज आणि व्याजापोटी राज्यावरील कर्जाचा डोंगर वाढत चालला आहे. यामुळे खर्च भागवताना अडचणी येत आहे.

वास्तविक पाहता अगदी सुरुवातीलाच कागदपत्रांची पडताळणी करायला हवी होती. कागदपत्रांची योग्य पूर्तता करणाऱ्या बहिणींनाच पात्र ठरवायला हवी होती. परंतु मते मिळवण्याच्या नादात अर्ज दाखल केलेल्या सरसकट महिलांना लाभ देऊन हा सर्व घोळ करण्यात आला. मग काय? या घोळातून मार्ग काढणे तर पर्याप्त होते. परंतु त्यासाठी करायचं काय हा प्रश्न होता. मग, सुरु झाली ती सर्वच निकषांच्या आधारे अर्जाची पडताळणी...त्यात जवळपास ५० टक्के बहिणींना वगळण्यात आले. परंतु उर्वरित ५० टक्के बहिणींनाही हप्ता अदा करण्यास कठिण जाऊ लागले.

आता, ईकेवायसीची प्रक्रिया निवडण्यात आली. या प्रक्रियेमुळे योजनेत पारदर्शकता आणून गैरव्यवहार टाळता येतो आणि लाभार्थ्यांची खरी पडताळणी होते असे म्हटल्या जात आहे. परंतु या ईकेवायसीत ५० टक्क्यातील ५० टक्के कमी केल्या जाण्याचा सरळ सोपा मार्ग दिसून आला आहे. ईकेवायसीसाठी बऱ्याच बहिणींनी आधार अपडेट केलेले आहे. त्यामुळे बहुतांश बहिणींनी आधारवरील मिस्टेक काढले आहे. जसं जन्मतारखेतील मिस्टेक, नावातील मिस्टेक आणि पत्त्यातील मिस्टेक...यामुळे आधी सादर केलेले आधार आणि आताच्या आधारमध्ये तफावत दिसून येईल. त्यामुळे काही बहिणींना वगळल्या जाईल.

दुसरा पर्याय म्हणजे प्रत्येक बहिणींनी राशन कार्डची ईकेवायसी केलेली आहे की नाही ते तपासल्या जाणार आहे. त्यामुळे यातही बऱ्याच बहिणी अडकल्या जाणार आहे. तिसरा आणि महत्त्वाचा पर्याय म्हणजे ज्या बहिणींकडे आधार लिंक्ड पॅन कार्ड असतील, तर आधार बेसवरून पॅन कार्डवरील आर्थिक व्यवहाराचा सर्व डेटा प्राप्त करून मॅक्सिमम इन्कमचा अंदाज बांधल्या जाणार आहे. सर्वात शेवटी सर्वच लाडक्या बहीणी आपल्या अकाउन्टला मिनिमम बॅलंस मेंटेनन्स करतात की नाही ते पाहल्या जाणार आहे. एकूणच दूरदृष्टीचा विचार करता पुढील खेळ काय असतील? हे आपल्या लक्षात आलेच असतील नाही का?

**-सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली,यवतमाळ**

# किती उमेदवारांकडे आहेत विकासाचे नवे मुद्दे ?

**आत्ताच प्रतिनिधी**

**धर्माबाद प्रतिनिधी/ गंगाप्रसाद सोनकांबळे/** धर्माबाद नगर परिषदेअंतर्गत तब्बल ९ वर्षानंतर सदस्य आणि नगराध्यक्ष पदासाठी निवडणुका होत आहेत.२०२१ मध्ये कोरोना काळात नगरपालिकेचा कार्यकाळ संपून आजतागायत म्हणजे चार वर्षे पालिकेवर प्रशासक राज होते. एवढ्या प्रदीर्घ कालावधीनंतर जनतेला आपले प्रतिनिधी निवडून देण्याची संधी आलेली असताना किती उमेदवार प्रबळ,सक्षम विकासाचे मुद्दे आहे. याव्यतिरिक काही ठिकाणी स्मशानभूमीचा एक प्रलंबित मुद्दा अनेकांकडे विकासकामांच्या यादीत पडून आहे. मत मागायला येणाऱ्या किती उमेदवारांनी विकासकामांचा जाहीरनामा प्रसिद्ध केला हेच अजून कोणाला माहीत नाही.

रोजगाराअभावी अनेक मतदार आज मेट्रो सिटी, औद्योगिक वसाहत असलेल्या शहरात कामानिमित्त वास्तव्यास आहेत. आज त्याच मतदारांवर आपली लीड वाढवता येईल का याची चाचपणी उमेदवार करत आहेत. मात्र



घेऊन जनतेसमोर जात आहेत हा चिंतनाचा विषय बनला आहे. प्रत्येक प्रभागात साधारण पाच-सहा उमेदवार निवडणूकिच्या रिंगणात उतरले आहेत. काही मोजके उमेदवार सोडले तर रस्ते,नाल्या,पाणी याशिवाय कुणाकडेही नवीन विकासाचे मुद्दे दिसत नाहीत.

स्वातंत्र्याच्या सत्तर - पंच्याहत्तरी नंतर सुद्धा केवळ प्राथमिक सुविधांनाच अजूनही विकासकामे म्हणून संबोधणे म्हणजे खूप मोठी शोकांतिका रोजगाराच्या संधी आपल्या परिसरात उपलब्ध करून घेण्यासंदर्भात प्रयत्न करण्यास कुणी तयार नाही. काही ठिकाणी तर मोठ्या पक्षांनी सुद्धा कमी शिकलेले उमेदवार दिले आहेत. शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यास त्यांचा काय हातभार लागेल हा विचार न केलेलाच बरा. प्रत्येक उमेदवार विरोधी पक्षांवर विकासाच्या बाबतीत आरोपांच्या फैरी झाडत आहेत मात्र रस्ते,नाली,पाणी याखेरीज मुद्देच बहुसंख्य उमेदवारांकडे नसल्याचे दिसते.

# संक्षिप्त

## जागतिक एडस दिनी (दि.१ डिसेंबर) विविध कार्यक्रम


**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ जागतिक एड्स दिन सोमवर दि.१ डिसेंबर रोजी विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि.१ रोजी सकाळी ७ वा. जिल्हा रुग्णालय चिकलठाणा येथून जनजागृती रॅली काढण्यात येणार आहे. अडथळ्यांवर मात करुन एकजुटीने एचआयव्ही एड्सला लढा देऊ नवं परिवर्तन घडवू, ही यावर्षाची संकल्पना आहे. तसेच सायकल रॅली, लोककला पथकांचा कार्यक्रम तसेच जागतिक एड्स दिन सप्ताहानिमित्त पोस्टर्स स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, दि.८ डिसेंबर रोजी सायंकाळी साडेसहा वा. पैठण गेट ते जिल्हा परिषद पर्यंत कँडल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. अशाच स्वरुपाचे कार्यक्रम तालुकास्तरावरही होणार आहेत असे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. ए.एम. मुदखेडकर यांनी कळविले असून सहभागाचे आवाहन केले आहे.

## बेपत्ता इसमाची माहिती कळविण्याचे आवाहन



**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ येथील कॅन्सर हॉस्पिटल मध्ये तपासणी आले असतांना विठ्ठल नारायण लडबडे वय ६५ वर्षे हा इसम बेपत्ता झाल्याची तक्रार त्यांचा मुलगा महादेव विठ्ठल लडबडे रा.वांगी ता.जि. वाशिम यांनी सिटी पोलिसात केली आहे. ही तक्रार दि.१० फेब्रुवारी २०२४ रोजी करण्यात आली आहे. विठ्ठल नारायण लडबडे वय ६५ वर्षे, वर्ण काळा, उंची पाच फुट अंगात पांढरा शर्ट त्यावर फुलांची काळी नक्षी, शरीर बांधा मध्यम या वर्णनाचा इसम कुणास आढळल्यास त्याबाबत स.पो. नि. एस.एन.आहेरकर यंच्याशी ८०८०५३३९९० या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## वयोवृद्ध इसम बेपत्ता; माहिती कळविण्याचे आवाहन



**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ येथील चलिपुरा परिसरातील रहिवासी रिजाय अजिमुल्ला सिद्धिकी वय ७५ वर्षे हे घरातून रागावून निघून गेले. ही घटना दि.१७ ऑगस्ट २०२२ रोजी घडली आहे. रिजाय अजिमुल्ला सिद्धिकी वय ७५ वर्षे वर्ण गोरा, डोळे घारे, उंची ५ फुट ५ इंच, नाक सरळ, अंगात ब्राऊन शर्ट,काळी पॅण्ट शरीर बांधा मध्यम, एका पायाने लंगडत चालतात, हिंदी व उर्दू भाषा येते. वरील वर्णनाचा इसम आढळल्यास त्याबाबत स.पो. नि. एस.एन.आहेरकर यंच्याशी ८०८०५३३९९० या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## लगाव येथील अखंड हरिनाम सप्ताह सुरुवात शुक्रवारपासून झाली




**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड ग्रामीण प्रतिनिधी/ सुनिल निकम** / कन्नड तालुक्यातील शेलगाव येथे सालाबाद प्रमाणे याही वर्षी शेलगाव येथील धर्माचार्य श्री श्री १००८ महामंडलेश्वर योगीर-ाज दयानंद महाराज शेलगाव यांच्या आशीर्वाद खाली सप्ताहाची सुरुवात आपले संतचरणरज ह भ प गणेश बापू महाराज शेलगाव यांच्या अध्यक्षाखाली शेलगाव येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे या सप्ताहात सकाळी काकडा भजन विष्णू सहस्र हरिनाम दुपारी श्रीमद् भागवत कथा व सायंकाळी सहा ते सात वाजेपर्यंत हरिपाठ व यानंतर महाराष्ट्रातील विविध विचारवंत कीर्तन रात्री आठ ते दहा या कालावधीत होणार आहे ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व्यासपीठ ह भ प रोहन महाराज मनगटे शेलगाव यांच्याकडे असणार आहे यात दिनांक २८ड़११ड़२०२५ पासून सुरुवात झाली शुक्रवारी ह भ प दत्तात्रय महाराज माळवंडीकर शनिवारी ह भ प योगेश महाराज गायके पोलीस अधिकारी तीर्थपुरी रविवारी ह भ प वारकरी भूषण ज्ञानेश्वर महाराज राऊत गणोरी सोमवारी ह भ प साक्षीताई रवींद्र महाराज अपार भागवताचार्य मंगळवारी ह भ प माधुरीताई शेरेकर अध्यक्ष राधा राणी सावरगाव बुधवारी ह भ प महंत महादेव महाराज गिरी अंतरवाली सराटी गुरुवारी ह भ प रामेश्वर महाराज मिसाळ वेरूळ शुक्रवारी ५ड़१२ड़२०२५ ह भ प संतोष महाराज आढावणे कुंभारी यांच्या काल्याचे किर्तन आणि अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता होणार आहे व यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले

तरी या सप्ताहाचे भाविक भक्तांनी आवर्जून लाभ घ्यावा असे आव्हान शेलगाव येथील पंचकमिटी व आयोजक यांनी केले आहे .

# लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी मतदान करा-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी








**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग आवश्यक आहे. त्यासाठी अधिकाधिक लोकांनी आपला मतदानाचा हक्क बजवावा,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज वैजापूर येथे केले.

नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ संदर्भात आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी वैजापूर येथे आढावा घे-तला.

निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी डॉ. अरुण जऱ्हाड, सहा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी भागवत विघोत, तहसिलदार सुनिल सावंत, उपविभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे, पोलीस निरीक्षक तावीजवाले तसेच अन्य अधिकारी- कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी मतदानाचे प्रमाण वाढणे आवश्यक आहे. जास्तीत जास्त मतदारांचा सहभाग हा लोकशाही व्यवस्था मजबूत करतो. महिला मतदारांमध्येही जागृती करुन त्यांनाही मतदानासाठी आवाहन करणे आवश्यक आहे. मतदान व मतमोजणी प्रक्रिया अधिकाधिक पारदर्शकपणे राबवावी,असे निर्दे शही जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले.

बैठकीत जिल्हाधिकारी स्वामी यांनी मतदान पूर्वतयारीचा आढावा घेतला. मतदान यंत्रे, स्ट्राँग रुम, मनुष्यबळ व्यवस्थापन, कायदा सुव्यवस्था आदी बाबींचा आढावा घेण्यात आला.

शाहीर अशोक बागुल आणि त्यांच्या पथकाने मतदान जनजागृतीपर पोवाडा सादर केला. जिल्हाधिकारी स्वामी यांनी 'मी मतदान करणारच' या स्वाक्षरी फलकावर स्वाक्षरी करुन आपला सहभाग दर्शविला.

## विभागीय आयुक्तांकडून महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कामकाजाचा आढावा




**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या विविध प्रकल्प आणि योजनांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा विभागीय आयुक्त तथा महानगर आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी आज घे-तला. प्राधिकरण क्षेत्रातील कामकाज अधिक गतीमान व पारदर्शक होण्यासाठी विविध संस्थांनाच्या प्रतिनिधीशी त्यांनी संवाद साधला.

विभागीय आयुक्त कार्यालयात झालेल्या बैठकीस महानगर नियोजनकार हर्षल बाविस्कर, सह महानगर नियोजनकार रवींद्र जायभाये, नगर रचना तज्ज्ञ सुनील सुकळीकर यांच्यासह प्राधिकरण क्षेत्रात कार्यरत वास्तुविशारद, अभियंता, सर्वेअर संघटना, मसिआ, क्रेडाई, आयआयए यांसह संबंधित संस्थांच्या प्रतिनिधींशी सविस्तर चर्चा करण्यात आली. प्राधिकरणाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विकास कामांबाबत सूचनांची देवाणघेवाण तसेच आवश्यक सु-धारणे संदर्भातही चर्चा झाली.

प्राधिकरण क्षेत्रात हस्तांतरणीय विकास हक्क (ढउठ) लागू करण्यास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने १७ ऑक्टोबर रोजीच्या बैठकीत मंजुरी दिली आहे. डीपी रस्ते व आरक्षणामुळे बाधित जमिनीचे हस्तांतरण करणाऱ्या जमीनमालकांना प्राधिकरणामार्फत टीडीआर जारी करण्यात येणार असून, त्यामुळे विकासकामांना आवश्यक गती मिळण्यास मदत होणार आहे.

युडीसीपीआर २०२० च्या विनिमय ११.२ मधील तरतुदीनुसार टीडीआर जारी केला जाणार असून विकास योजना मंजूर झालेल्या प्राधिकरण क्षेत्रातून टीडीआर निर्मिती केली जाणार आहे. टीडीआर प्रदान करण्याची प्रक्रिया छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेमध्ये सध्या अवलंबिली जाणारी प्रक्रिया याच धर्तीवर असणार असून जमीनमालकांना मंजूर टीडीआरचा वापर प्राधिकरण क्षेत्रात करता येणार आहे.

विभागीय आयुक्तांनी प्राधिकरणाच्या कामकाजामध्ये गती, पारदर्शकता आणि नियोजनशिस्त राखत विकास प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यावर भर देण्याच्या सूचना दिल्या.

प्राधिकरण क्षेत्रातील नागरिकांना दर्जेदार सुविधा व नियोजित विकास देणे हे प्राधिकरणाचे सर्वांत महत्त्वाचे ध्येय असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## आश्रम शाळा घानेगाव तांडा येथे दशसूत्री कार्यक्रमांतर्गत पालक सभा

**आत्ताच एक्सप्रेस**
**सोयगाव प्रतिनिधी** / सोयगाव तालुक्यातील वि.जा. प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा घानेगाव तांडा



येथे मंगळवारी (दि. २५) शासन आदेशान्वये दशसूत्री उपक्रमांतर्गत पालक, विद्यार्थी व शिक्षक मेळावा घेण्यात आला यावेळी दशसूत्री कार्यक्रमाबाबत शिष्यवृत्ती, मूल्य संस्कार, विद्यार्थी सुरक्षा,संस्कार इत्यादी विषयावर सखोलपणे चर्चा करण्यात आली.

पालक मेळाव्यात सुनील कवीश्वर, देवचंद बागुल, मनोज पाटील, सलीम तडवी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी बहुसंख्येने विद्यार्थी, पालक, शिक्षक उपस्थित होते.

## सिमेंट रस्त्याचे काम कासव गतीने सुरु परिसरातील नागरिकांची गैरसोय ठेकेदाराचा मनमानी कारभार




**आत्ताच एक्सप्रेस**
**गंगापूर/ प्रतिनिधी/ सुभान शहा**/ गंगापूर शहरा-तील नगरपालिका अंतर्गत प्रभाग क्रमांक ५ जुना मांजरी रोड या परिसरात सिमेंट रस्त्याचे काम अत्यंत कासव गतीने सुरू असल्यामुळे या परिसरातील नागरिकांना या रस्त्यावरून ये जा करण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत आहे. मागील एक महिन्यापासून या परिसरातील सिमेंट रस्त्याचे काम सुरू आहे. ठेकेदार याचा मनमानी कारभार असल्यामुळे हे काम होत नसल्याची चर्चा आहे. या कामाला मुहूर्त लागणार का? या कामाची सुरुवात कधी होणार असा प्रश्न या परिसरातील नागरिकांनी उपस्थित केला आहे. या परिसरातील ५ रस्त्याचे काम सुरू आहे. या रस्त्यावर खडी पासून काम बंद करून देण्यात आले आहे या रस्त्यावरून रात्रीचं नागरिकांना चालना म्हणजे जीव धोक्यात घालण्यासारखे आहे. सध्या नगरपरिषद निवडणुकीची रणधुमाली सुरू आहे.

यामुळे या कामाला मुहूर्त लागत नाही का? असा प्रश्न या परिसरातील नागरिकांनी उप-स्थित केला आहे. या कामाचा आणि निवडणुकीचा काही संबंध येत नाही परंतु ठेकेदार आपल्या मनमानी पद्धतीने हे काम करत असल्याची चर्चा आहे. लवकरात लवकर हे काम पूर्ण करावी अशी मागणी या परिसरातील नागरिकांनी केली आहे. या रस्त्याचे काम चालू असल्यामुळे या परिसरातील जलवाहिनी जा-गोजागी फुटलेली आहे. लाखो लिटर पाणी वायाला जात आहे. फुटलेली जलवाहिनी दुरुस्त करून हे काम पूर्ण करावे अशी मागणी जोर धरत आहे.

## काही वर्षांपासून बंद पडलेला रुई पांदण रस्ता सुरु करण्यासाठी तहसीलदारांना ग्रामस्थांचे निवेदन



**आत्ताच एक्सप्रेस**
**सुखापूरी प्रतिनिधी** / घुंगर्डे हादगाव ते रुई दरम्यानचा पांदण रस्ता मागील काही वर्षांपासून पूर्णपणे बंद पडला असून त्यामुळे शेतकरी व नागरिकांचे हालहाल झाले आहेत.

या रस्त्याचा वापर पूर्णपणे ठप्प झाल्याने शेतमाल वाहतूक, जनावरांची हालचाल आणि दैनंदिन गरजा भागविण्यात मोठ्या अडचणी निर्माण झाल्या आहेत. या रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करून तो पुन्हा सुरू करण्यासाठी आज ग्रामस्थांच्या वतीने मा. तहसीलदार साहेब, अंबड यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, गेल्या काही वर्षांपासून रस्ता बंद असल्यामुळे लोकांना पर्यायी मार्गाने लांब फेऱ्या माराव्या लागत आहेत. हा पांदण रस्ता सुरु झाल्यास गावांतील दळणवळण सुकर होईल तसेच ग्रामीण भागातील गरजांची पूर्तता सहज होऊ शकेल.

ग्रामस्थांनी तहसीलदार साहेबांकडे रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी करून तातडीने कामास मंजुरी देण्याची मागणी केली. यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्रातील सरकार केवळ फोडाफोडीचे राजकारण करीत आहे - माजी मंत्री अमित देशमुख..

**आत्ताच एक्सप्रेस**
**खुलताबाद प्रतिनिधी**/ खुलताबाद महाराष्ट्रातील सरकार खासदार, आमदार खरेदी करण्याबरोबरच आता मतदार खरेदीचे देखील काम करीत असल्याची घणाघाती टिका माजी मंत्री अमित देशमुख यांनी शुक्रवारी (ता. २८) महाविकास आघाडीच्या नगराध्यक्ष पदाचे उमेदवार सय्यद आमिर पटेल यांचे प्रचार सभेत केली.

खुलताबाद शहरातील जुना बसस्टँड परिसरात महाविकास आघाडीच्या नगराध्यक्ष पदा-चे उमेदवार व नगरसेवक पदासाठीच्या उमेदवारांच्या प्रच-ारार्थ प्रचार सभा आयोजित करण्यात आली होती.

यावेळी मतदारांना आ-वाहन करतांना माजी मंत्री देशमुख यांनी शहरासाठीची पाणीपुरवठा आपल्या मंत्री पदाच्या कार्यकाळातच मंजूर केल्याची आठवण करून दिली.मतदारांनी आमच्यावर विश्वास दाखवा,विकासाची जबाबदारी आमच्यावर सोडवा.यावेळी व्यासपीठावर खासदार डॉ.कल्याण काळे, माजी आमदार नामदेवराव पवार, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष किरण पा. डोंणगांवकर.

तालुकाध्यक्ष अनिल नलावडे माजी तालुकाध्यक्ष अनिल पाटील श्रीखंडे शहराध्यक्ष अब्दुल मजीद मणियार. आबेद जागीरदार. अल्पसंख्याक तालुका कमिटीचे अध्यक्ष मसियोद्दीन सौदागर. माजी शहराध्यक्ष अब्दुल समद टेलर. शेख सरफराज. नासिर मौलाना. औरंगाबाद शहराध्यक्ष शेख युसुफ माजी शहराध्यक्ष इब्राहिम पठाण.

सामाजिक कार्यकर्ते राजू सेट यांच्या सह महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.





## संक्षिप्त

### स्थानिक स्वराज्य संस्था सार्वत्रिक निवडणूक -२०२५
### जिल्ह्यातील मद्यविक्री अनुज्ञप्त्या बंद ठेवण्याचे आदेश जारी

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनिधी**/ राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्था सार्वत्रिक निवडणूक -२०२५ साठी दि. ४ नोव्हेंबर २०२५ रोजी कार्यक्रम जाहीर केला आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आलेली आहे. या कार्यक्रमानुसार जालना जिल्ह्यातील अंबड, भोकरदन आणि परतूर येथील नगरपरिषदेसाठी सार्वत्रिक निवडणुका होणार असुन मतदान २ डिसेंबर २०२५ रोजी होणार आहे.

निवडणुक कालावधीत कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती अबाधित रहावी तसेच निवडणुक प्रक्रिया मुक्त व शांततामय मार्गाने होणे आवश्यक आहे. तरी जिल्हाधिकारी, जालना यांनी मुंबई दारुबंदी कायदा १९४९ चे कलम १४२ (१) अन्वये प्रदान झालेल्या अधिकारानुसार जालना जिल्ह्यातील नगरपरिषद निर्वाचन क्षेत्रातील सर्व किरकोळ देशी तसेच विदेशी मद्य विक्री करणाऱ्या अनुज्ञप्त्यांचे (सीएल-२, सीएल-३, एफएल-१, एफएल-२, एफएल-३, एफएल-४ आणि एफएलबीआर-२) व्यवहार दि.१ डिसेंबर २०२५ रोजी म्हणजेच मतदानाच्या अगोदरच्या दिवशी संपुर्ण दिवस, दि. २ डिसेंबर रोजी म्हणजेच मतदानाच्या दिवशी आणि दि.३ डिसेंबर २०२५ रोजी म्हणजेच मतमोजणीच्या दिवशी संपुर्ण दिवस पुर्णतः बंद ठेवावी. असे आदेश जिल्हाधिकारी, जालना यांनी जारी केले आहेत.

# आज जालना जिल्ह्यातील ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचा जिल्हा मेळावा
## राज्याध्यक्ष संजीव निकम यांच्या सह मराठवाडा विभागातील पदाधिकारी राहणार उपस्थित

**आत्ताच एक्सप्रेस**
**आष्टी प्रतिनिधी** / आज जालना जिल्ह्यातील ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचा जिल्हा मेळावा हा केवळ औपचारिक कार्यक्रम नसून, ग्रामीण प्रशासनाच्या भविष्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणारा एक व्यापक संवादमंच ठरत आहे. ग्रामीण पातळीवरील शासनव्यवस्था अधिक प्रभावी, पारदर्शक आणि परिणामकारक करण्यासाठी ग्रामपंचायत अधिकाऱ्यांवर मोठी जबाबदारी असते. या सर्वांचा विचार करता जालना जिल्हा शाखेकडून २९ नोव्हेंबर २०२५ शनिवार, सकाळी ११ वाजता *ग्रामपंचायत अधिकारी भवन, जालना* येथे आयोजित करण्यात आलेला हा मेळावा अनेक दृष्टींनी ऐतिहासिक ठरणार आहे.

या मेळाव्याची माहिती जिल्हाध्यक्ष डी.बी. काळे आणि सरचिटणीस व्ही.ए. भगत यांनी दिली असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना या महत्त्वपूर्ण बैठकीसाठी निमंत्रित करण्यात आले आहे. या मेळाव्याला महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन डी. एन.ई.१३६ चे *राज्य अध्यक्ष संजीव निकम* यांच्यासह राज्य व विभागीय स्तरावरील अनेक मान्यवर पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

त्यात राज्य कोषाध्यक्ष भिमराज दाणे पाटील , राज्य महिला उपाध्यक्ष श्रीमती दुर्गा भालके , राज्य सल्लागार विजयसिंह नलावडे , विभागीय उपाध्यक्ष दिलीपराव पांढरे पाटील*, विभागीय सहसचिव *सखाराम काशीद* तसेच मराठवाडा विभागातील सर्व जिल्हाध्यक्ष व सरचिटणीसांचा समावेश आहे. त्यांच्या उपस्थितीमुळे संघटनेच्या कामकाजास नवचैतन्य मिळणार असून अधिकारी बांधवांना प्रत्यक्ष संवादाची संधी मिळणार आहे.

मेळाव्यादरम्यान ग्रामपंचायत अधिकारी संवर्गाशी संबंधित अनेक ज्वलंत मुद्द्यांवर सखोल चर्चा होणार आहे. राज्य स्तरावर संघटनेमार्फत करण्यात आलेल्या कामांची, शासनदरबारी मांडण्यात आलेल्या मागण्यांची, तसेच आतापर्यंत झालेल्या प्रगतीची विस्तृत माहिती येथे सादर केली जाणार आहे. अलीकडच्या काळात जिल्हा परिषद प्रशासनाकडून ग्रामपंचायत अधिकारी संवर्गाशी होणारी अपमानास्पद वागणूक, अनावश्यक दबावतंत्र, तसेच कारभारातील अडथळ्यांमुळे निर्माण झालेल्या तणावग्रस्त वातावरणावरही गंभीर चर्चा केली जाणार आहे.

संघटनेच्या माध्यमातून अधिकारी बांधवांना न्याय मिळावा, त्यांचे हक्क सुरक्षित राहावेत आणि कामकाज सुकर व्हावे, यासाठी पुढील रणनीती या मेळाव्यात निश्चित केली जाणार आहे. याशिवाय जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधील ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना भेडसावणाऱ्या अडचणी, मनुष्यबळाची कमतरता, प्रशासकीय अडथळे, तांत्रिक सुविधांची कमतरता, विलीनीकरण प्रक्रियेतील गुंतागुंत, कागदपत्रांची विलंबित प्रक्रिया इत्यादी विषयांवरही विस्तृत चर्चा अपेक्षित आहे.

सर्व अधिकारी बांधवांनी आपले अनुभव, अडचणी आणि सूचना मांडण्यासाठी या व्यासपीठाचा प्रभावी वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



मेळाव्याला उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष डी.बी. काळे, मानद अध्यक्ष पी.बी. पवार, सरचिटणीस व्ही.ए. भगत, कार्याध्यक्ष एम.एम. मिसाळ, कोषाध्यक्ष एस.व्ही. पुरी, उपाध्यक्ष संजय काचेवाड, पी.पी. पालवे, सुरेखा लाखोले तसेच सर्व जिल्हा व तालुका पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

संघटनेची एकजूट, अधिकाऱ्यांचा आत्मसन्मान, आणि ग्रामीण शासनव्यवस्थेची मजबुती यासाठी हा मेळावा एक महत्त्वाची पायरी ठरणार असून-जालना जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत अधिकारी बांधवांनी शंभर टक्के उपस्थिती दाखवून या मेळाव्याला यशस्वी करावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.



महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांना मरूनोत्तर भारतरत्न पुरस्कार द्यावा महात्मा ज्योतिबा फुले यांची १३५ वी पुण्यतिथी जालना शहर महानगरपालिका च्या प्राणांगणात पूर्णाकृती पुतळ्यात अभिवादन करून पुण्यतिथी साजरी करण्यात आली साजरी करण्यात आली.
यावेळी शांती दूध आकाशात सोडून महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार द्यावा अशी मागणी करण्यात आली.
यावेळी महानगरपालिकेचे अति रिक्त आयुक्त अर्जुन गिराम उपायुक्त नंदा गायकवाड कार्यालयीन अधीक्षक विजय फुलंब्रीकर केशव कानपुडे अनुराधा नागोरी अर्पणा जाधव कोमल गावंडे प्रतिभा मोरे बाबासाहेब वानखेडे वंदना घाडगे खांडेभराड सतीश खांडेभराड सुरेश रत्नपारखे कडूबा वाकीकर शिवलाल घाडगे सुंदरराव कुदळे सचिन वानखेडे निखिल पाऊलबुद्धे मेहत्रे अमरदीप शिंदे सुभाष गिराम सदानंद तवले संजय शिरसाट विशाल तवले रंजना शिरसाट आर शिंदे ऋतुजा खरात विष्णू घायाळ शंकर तारो आदी सह फुले अन्याय उपस्थित होते.

# लखपती दीदी अंतर्गत बचत गटातील महिलांना पापड मशीन तेल कांडप यंत्र





**आत्ताच एक्सप्रेस** /
**सोयगाव / प्रतिनिधी** / ग्राम संसद कार्यालय जरंडी ता. सोयगाव मार्फत लखपती दीदी अंतर्गत बचत गटातील महिलांना पापड मशीन तेल कांडप यंत्र दिले आहे. तर ग्रा..पं. गावठाण मधील दहा गुंठा जमिनीमध्ये परसबाग फुलवले आहे.

सरपंच स्वाती दिलीप पाटील उपसरपंच संजय गिरधर पाटील , मधुकर लोटन पाटील, मधुकर शंकर सोनवणे, एस एम मंगरुळे ग्रामपंचायत अधिकारी जरंडी यांच्या सहकाऱ्यांन गरजू महिलांना अर्थसहाय्य मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले गावातील गोरगरीब महिलांना लखपती दीदी बनवले.

## आश्रम शाळा घानेगाव तांडा येथे संविधान दिन उत्साहात साजरा



**आत्ताच एक्सप्रेस**
**सोयगाव प्रतिनिधी** / वि.जा.प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा घानेगाव तांडा प्रशालेत २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांनी संविधान दिनाची सामूहिक शपथ घेऊन झाली.

लोकशाही मूल्यांचे पालन व राष्ट्रीय कर्तव्याची जाणिव ठेवण्याची प्रतिज्ञा करत विद्यार्थ्यांनी दिवसाचे महत्त्व अधोरेखित केले.नंतर विद्यार्थ्यांनी उत्साहात जयघोष करत गावातून रॅली काढली.कार्यक्रमादरम्यान डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या संविधान निर्मितीतील महान योगदानाची माहिती शिक्षक सुनील कवीश्वर यांनी दिली.

संविधानातील हक्क , कर्तव्य,समता आणि लोकशाहीचे तत्व याबाबत शिक्षक मनोज पाटील, देवचंद बागुल,सलीम तडवी यांनी मार्गदर्शन केले.

# कवडेंच्या प्रचारार्थ ना.गुलाबरावांचे झंजावती भाषण.....

**कन्नड एक्सप्रेस**
**उदय कुलकर्णी** / कन्नड न.परिषदेच्या प्रचाराची रंधुमाळी सद्या जोरात चालू असुन न.परिषदेच्या नगराध्यक्ष पदासाठी शिवसेना (शिंदे,) गटाकडून सौ.अनिताबाई कवडे,भाजप - राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून सौ.स्वातीताई कोल्हे तर काँग्रेस,उबाठा व राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून फरीन बेगम अब्दुल जावेद मैदानात उतरले असुन तिन्हीही उमेदवांसाठी पक्षाच्या वरिष्ठानी आपआपल्या उमेदवारांच्या प्रचारार्थ शहरात प्रचाराची रंधुमाळी उठविली आहे.

दि.२७ गुरुवार रोजी राज्याचे पाणी पुरवठा मंत्री पक्षाचा ढाण्या वाघ व बुलंद तोफ ना.गुलाबराव पाटील यांची शहरातील पिशोर नाका येथे शिवसेना पक्षाच्या नगराध्यक्ष व नगरसेवक पदाच्या उमेदवांसाठी कन्नच्या आमदार सौ.संजनाताई जाधवांच्या मार्गदर्शनाखाली सभेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी बोलतांना ना.गुलाबराव पाटील म्हणाले की,राज्यात आमचे मित्र म्हणून सोबत असलेल्या भाजप-राष्ट्रवादी पक्षाने या ठिकाणी युती करून आमचे विरोधात उमेदवार उभा केला आहे.

यात राष्ट्रवादी पक्षाने भाजपास प्रेमाच्या जाळ्यात अडकवून ही युती केली आहे. त्यामुळे वर डोके भाजपचे तर धड राष्ट्रवादीचे यामुळे कुठे शहराचा विकास होतो का! असा प्रश्नही मतद्वांसमोर उपस्थित करून, त्यासाठी संपूर्ण शरीरच एका पक्षाचे लागते व ते आम्ही कवडेताईंच्या रूपात आमचे शिवसेना दिले आहे.

मतदार राजाने या शहराच्या सर्वांगीक विकासासाठी त्यांना व त्यांचे सोबतच्या उमेदवारांना भरघोस मत धिक्याने विजयी करावे,असे आव्हानच प्रचार सभेत केले.

यावेळी पक्षाचे खासदार संदीपान भुमरे यांनीही आपल्या भाषणात असे सुतोवाच केले की,या कन्नड नगरीच्या सर्वांगिक विकासासाठी मी पुढाकार घेऊन या ठिकाणच्या औट्रम घाटातील बोगद्यासाठी प्रयत्न करून त्यास निधी मिळविला पण फलक व जाहिरातीवर फ़ोटो व नाव मात्र दुसऱ्याचेच झळकले असा खोचक टोलाही त्यांनी नाव न घेता भाजपच्या डॉ.करडांना लगावला.या संपूर्ण कार्यक्रमाचे प्रस्ताविक शिवाजी थेटे यांनी केले.यावेळी व्यासपीठावर मंत्री ना.गुलाबराव पाटील,खा. संदीपान भुमरे,आ.सौ.संजनाताई जाधव जि.दुध संघाचे अध्यक्ष गोकुळसिंग राजपूत, नागराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. अनिताताई कवडे, सोनाली घटबळे, सुनील पवार,क.ऊ बाजार समितीचे अध्यक्ष डॉ.मनोज राठोड सह हजारो मतदारांची उपस्थिती दिसून आली.











हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813